# जाहीर सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, धुळे मंडळ, विद्युत भवन, साक्री रोड, धुळे या आस्थापनेवर सन २०२६ - २७ करिता विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात प्रशिक्षणासाठी आय. टी. आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडुन एकुण-६० जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक- ०९.०९.२०२६ ते दिनांक-१८.०९.२०२६, सायं ५:३० वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E07252700034 वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दिनांक १८.०९.२०२६ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. **टिप :** अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक १८.०९.२०२६ रोजी सायं ०५:३० पर्यंतची राहील. उमेदवाराने www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. **सदर भरती ही धुळे जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी आहे याची नोंद घ्यावी.** ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणिक प्रमाणपत्र - आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवाशी दाखला ई.) साक्षांकीत छायांकित प्रत दिनांक १८.०९.२०२६ पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय धुळे, विद्युत भवन, साक्री रोड, धुळे येथे प्रत्यक्ष सादर करावी. तसेच शैक्षणिक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत छायांकित प्रत सादर न करणाऱ्या उमेदवाराच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**पी.आर.ओ.क्र.- JLGZ १०५/२०२६-२०२७**

**अधीक्षक अभियंता, महावितरण धुळे मंडळ.**

Mahabharti.in